**रे.दि.मु.क्र.१११/२०२४**
(सुनिल विरूध्द अनंत)

**आदेश नि.४९ खाली**
**(CNR No.MHRT-070013302024)**
**(पारीत दि.०३/०४/२०२५)**

वादी यांनी सदरचा अर्ज **दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश २६ नियम ९** अन्वये 'स्थानिक अन्वेषणाकरिता न्यायालयीन आयुक्त' म्हणून जमीन मोजणीचे तंत्रज्ञानामधील अनुभवी व्यक्तीची नेमणूक करण्यात यावी या विनंती अन्वये दाखल केलेला आहे.

**वादीचे कथन —**

२. दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे. वादीने प्रतिवादी क्र. १ याने गट क्र. १४३ मध्ये चालू केलेले घराचे बांधकाम त्वरीत थांबवावे याकरीता तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज दाखल केलेला आहे. उलटपक्षी प्रतिवादी क्र. १ ने देखील बांधकाम करण्यास हरकत व अडथळा करु नये या आशयाचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज वादी विरुध्द दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ याने वादीच्या पत्नीच्या नावे असलेले ग्रामपंचायत घर क्र. २४४ दावा मिळकतीमध्ये असल्याचा उल्लेख केलेला आहे. सबब ग्रामपंचायत घर क्र. २४४ बाबत योग्य ती वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यासाठी जमीन मोजणीचे तंत्रज्ञानामधील अनुभवी व्यक्तीची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

**प्रतिवादी क्र. १ चे म्हणणे – (निशाणी ९३)**

३. अर्ज खोटा व खोडसाळ आहे. ग्रामपंचायत घर क्र. २४४ गट क्र. १४१ मध्ये आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये सिमावाद अथवा अतिक्रमणाचा वाद नाही. तसेच त्या अनुषंगाने वादमुद्दा देखील नाही. दाव्याचे कामकाज

प्रलंबित रहावे या हेतुने अर्ज दाखल करण्यात आला आहे. अर्ज मंजूर करण्याचे न्यायालयाचे मत झाल्यास गट क्र. १४३ सह गट क्र. १४१ ची हद्द ठराव मोजणी करण्यास प्रतिवादी क्र. १ ची हरकत नसल्याचे कथन केले आहे. तसेच मोजणीचा खर्च वादीवर लादण्यात यावा अशी देखील विनंती केली आहे.

४. अर्जाचे, म्हणण्याचे व अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. **मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या सिताराम सुखलाल पाटील विरूध्द वासुदेव सुखलाल पाटील, रिट पिटीशन क्र.९६२६/२०१६** मध्ये नमुद मार्गदर्शक तत्व की, ''न्यायालयीन आयुक्त नेमणूकीचा योग्य टप्पा हा वादीचा पुरावा चालू झाल्यानंतर आहे. सदरचा न्यायालयीन आयुक्त नेमणूकीचा अर्ज हा तुर्तातूर्त ताकिदीचा अर्ज निकाली करण्यापूर्वी दाखल करणे अपेक्षीत नाही''.

६. **दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९** अन्वये न्यायालयीन आयुक्तांची स्थानिक अन्वेषणा करिता नेमणूक ही केवळ वादग्रस्त विषयावर अधिक प्रकाशझोत टाकण्याची आवश्यकता असेल तरच करण्यात येवू शकते.

७. दावा हा वाटपासाठी व प्रतिवादी क्र. १ याने दावा मिळकतीमध्ये चालू केलेले बांधकाम थांबविणे बाबत निरंतरची ताकीद मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. तसेच प्रस्तुतकामी प्रतिदावा हा जाहीर ठराव व प्रतिवादी क्र. १ यांच्या बांधकामास वादी यांनी कोणताही हरकत व अडथळा करु नये या विनंती अन्वये दाखल केलेला आहे.

८. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ अन्वये न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक केवळ वादग्रस्त मुद्दयावर प्रकाशझोत टाकण्यासाठी करण्यात येते. प्रस्तुतकामी उभयपक्षकारांतर्फे ग्रामपंचायत घर क्र.२४४ ची सद्यस्थिती दर्शविण्याबाबतचे नकाशे व अहवाल अभिलेखावर

दाखल करण्यात आलेले आहेत. प्रस्तुतकामी मान्यतः वादमुद्दे स्थापित करुन वादीचा पुरावा चालू झालेला नाही. वादी ज्या ग्रामपंचायत घर क्र. २४४ ची सद्यस्थिती अभिलेखावर आणू इच्छित आहे ती स्थिती वादी स्वतंत्र पुराव्याद्वारे देखील अभिलेखावर सादर करु शकतात. त्या अनुषंगाने उभयपक्षकारांतर्फे अभिलेखावर मोजणीदारांचे नकाशे व अहवाल देखील सादर करण्यात आलेले आहेत. सबब दाव्याच्या या टप्प्यावर वादी न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करुन मिळविण्यास पात्र नाही.

९. सबब वर नमुद कारणांचा विचार करून वादीने दाखल केलेला अर्ज **दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९** यामध्ये नमुद तरतुदीच्या कक्षेमध्ये येत नाही. तसेच माननीय उच्च न्यायालय मुंबई यांनी सिताराम सुखलाल पाटील (वर नमुद) मार्गदर्शक तत्वानुसार प्रस्तुतचा अर्ज दाव्याचे या टप्प्यावर कायद्याने चालणारा नाही. सबब वर नमुद कारणांचा विचार करून मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करिता खालील आदेश पारीत करीत आहे—

## आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च उभय पक्षकारांनी सोसावा.

Sd/-

दिनांक :—०३/०४/२०२५.

(मयुरेश आर. काळे)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
चिपळूण.